


# सेतू संवादाचा

**LGBTIQ समूह आणि सामाजिक चळवळी यांच्यातील परस्परसंवाद**

२५ मे २०१९, राष्ट्र सेवा दल संकुल, पुणे



# अनुक्रम

१. **सेतू संवादाचा:** पार्श्वभूमी, भूमिका व उद्देश ............ ३

२. **स्वागत** ............ ४

३. **प्रस्तावना** - मनिषा गुप्ते ............ ४

४. **सत्र १ - लैंगिकता, लिंग आणि लिंगभाव (sexuality, sex and gender)**

**वक्ते** - विद्या बाळ, हरिश सदानी, बिंदूमाधव खिरे, शमिभा ............ ६

५. **सत्र २ - विविध सामाजिक चळवळी**

**वक्ते:** तेजस्वी सेवेकरी, किरण, सुधीर, सीमा लिमये ............ ८

६. **सत्र ३ - Identities / अस्मिता**

**वक्ते:** अच्युत बोरगावकर, हसीना खान, गौरी भोपटकर ............ १०

७. **सत्र ४ - कला**

**वक्ते:** अनुभव बर्वे, मैत्रेयी, धर्मकिर्ती सुमंत, वैभव अबनावे ............ १२

८. **सत्र ५ - आरोग्य**

**वक्ते:** डॉ. गंगाखेडकर, डॉ. हेमा पिसाळ, डॉ. विनिता बाळ, साधना नातू ...... १४

९. **सत्र ६ - राजकीय व आर्थिक सत्ताकारण**

**वक्ते:** दिशा पिंकी शेख, दीपनिता, मुकुंद किर्दत ............ १६

१०. **पुढील नियोजन** ............ १८

- **परिशिष्ट १ -** आयोजक टीम

# सेतू संवादाचा

## परिसंवाद वृत्तांत

२५ मे २०१९, राष्ट्र सेवा दल संकुल

LGBTIQ (लेस्बियन, गे, बाय-सेक्शुअल, ट्रान्सजेंडर, इंटरसेक्स, क्विअर) या नावावे ओळखली जाणारी समलिंगी आणि विभिन्नलिंगी समुदायांची चळवळ ही व्यापक समाज परिवर्तनाच्या चळवळीचा एक अविभाज्य भाग आहे. ही चळवळदेखील 'वह सुबह कभी तो आयेगी….' म्हणत शोषणविरहित व समताधिष्ठित समाजाचे स्वप्न पाहते. म्हणूनच परिवर्तनाच्या विविध चळवळी आणि LGBTIQ यांच्यातील अंतर कमी होण्याची गरज आहे. या गरजेचे चर्चेत आणि चर्चेचे कृतीत रूपांतर होत महाराष्ट्रात 'सेतू संवादाचा' हा एक नवा प्रयत्न आकार घेतो आहे. त्याचा पहिला परिसंवाद दिनांक २५ मे २०१९ रोजी पुण्यातील राष्ट्र सेवा दल संकुल सभागृहात झाला. या कार्यक्रमाची पार्श्वभूमी आणि दिवसभरात विविध विषयांवर झालेल्या मांडण्या, चर्चा यांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

### पार्श्वभूमी

वंचित समुहांच्या प्रश्नांसाठी, लोकशाहीच्या बळकटीसाठी विविध सामाजिक आंदोलने होत आहेत. ही आंदोलने जशी स्वतंत्रपणे विशिष्ट समुदायांच्या मुद्द्यांवर सक्रीय असतात, तशीच ती कधी कधी एकत्रितपणेही होतात. सामाजिक अन्यायाविरोधात सामूहिक आवाज उठवण्याची गरज भासते तेव्हा सर्व आंदोलने, त्यातील कार्यकर्ते एकत्रितपणे, हातात हात घालून लढतात. या एकत्रित येण्याच्या अनुभवामध्ये आणि तयार झालेल्या मैत्रीमध्ये आपली परिवर्तनवादी चळवळ सर्वसमावेशक करण्याची बीजे दडलेली असतात. त्यांचा शोध घेऊन ती फुलवण्याची व वाढवण्याची गरज आहे. त्यासाठी परस्परांच्या कामांविषयीची अनभिज्ञता दूर झाली पाहिजे आणि आपल्या लढ्यांमधील समान सूत्रे शोधली पाहिजेत. उदाहरणार्थ, स्त्रीवादी कार्यकर्ते आणि LGBTIQ समुहांच्या प्रश्नांसाठी लढणारे कार्यकर्ते या दोघांचा लढा अंतिमत: पितृसत्ताक व्यवस्थेविरुद्ध आहे. परंतु या दोन्ही चळवळीतील कार्यकर्ते केवळ कार्यक्रमांपुरतेच एकत्र येताना दिसतात. मानवाधिकारांसाठी सक्रीय असलेल्या कार्यकर्त्यांना प्राणी हक्कासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांचे काम माहिती नसते, तर जातीअंतासाठी काम करणाऱ्यांनी बालहक्कांसाठी चाललेल्या कामाशी जोडून घेतलेले नसते. लोकशाहीचा अवकाश आकुंचित होत असलेल्या या काळात अशी अलिप्तता आपल्या प्रत्येकाच्याच कामासाठी धोकादायक आहे. म्हणूनच विविध सामाजिक चळवळी व पुरोगामी कार्यकर्ते यांच्यातील नाते अधिक घट्ट व्हायला हवे आहे.

याच विचाराने मागील दीड-दोन महिने विविध चळवळीत सक्रीय असलेले राज्यातल्या विविध ठिकाणचे काही कार्यकर्ते एकत्र आले. पुण्यामध्ये त्यांच्या तीन बैठका झाल्या आणि त्यातून विविध चळवळींची आपापसात देवाणघेवाण व्हायला हवी यासाठी काय करायचे याची आखणी झाली. त्याची सुरुवात 'सेतू संवादाचा' या २५ मे २०१९ ला आयोजित एकदिवसीय परिसंवादाने झाली. (परिशिष्ट १ - 'सेतू संवादाचा' - संवादक गट आणि सहभागी कार्यकर्त्यांची नावे)

### भूमिका

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान अधिकार बहाल केले आहेत. समानता, सन्मानाने जगण्याचा हक्क, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे घटनात्मक अधिकार समान असले तरी प्रत्येक नागरिकाला त्याचा समान उपभोग घेता येत नाही. घटनात्मक अधिकारांपासून वंचित असलेल्या जनसमूहांपैकी एक समूह म्हणजे समलिंगी आणि विभिन्नलिंगी व्यक्तीसमूह. स्त्री व पुरुष या दोनच लिंगांची ओळख समाजमान्य असल्याने त्यापलिकडे स्वत:ची ओळख असलेल्या व ती घेऊन जगण्याचे स्वातंत्र्य मागणाऱ्या व्यक्तींना समाज स्वीकारायला तयार नसतो.

समाजाचे हे पूर्वग्रह काही प्रमाणात सामाजिक चळवळींमध्येही प्रतिबिंबित होताना दिसतात. उदाहरणार्थ, लैंगिकतेचं उदाहरण पाहिलं तर पुरोगामी चळवळींमध्ये लैंगिकतेबद्दल, विशेषतः LGBTIQ विषयांबाबत अधिक खुली चर्चा होताना दिसत नाही. त्याचप्रमाणे LGBTIQ व्यक्तींची ओळख केवळ लैंगिकतेच्या चौकटीत पाहिली जाऊ नये असं या समूहातल्या अनेक व्यक्तींना वाटते. समलिंगी, विभिन्नलिंगी, अन्य लिंगी किंवा पुरुष-स्त्री अशा द्वैतांच्या (binaries) चौकटी मध्ये न बसणाऱ्या किंवा बसू इच्छित नसणाऱ्या व्यक्तींना

चळवळींमध्ये 'कार्यकर्ता' म्हणून सहज स्वीकारले जात नाही अथवा त्यांनी चालवलेल्या चळवळींमध्ये इतर चळवळीत सक्रीय असलेले पुरोगामी कार्यकर्ते सहसा सहभागी होत नाहीत. ही दरी सांधण्याच्या भूमिकेने ‘सेतू संवादाचा’ प्रयत्न जन्माला आलेला आहे.

**परिसंवादाचे उद्देश**

- लैंगिकता/जेंडर, वय, शरीराची रचना, जात, धर्म, वर्ग इत्यादीमुळे असलेलं वैविध्य हे विषमतेला कारणीभूत ठरू नये
- माणुसकीचा सेतू परस्पर संवादाच्या माध्यमातून भक्कम केला जावा. समलैंगिक समुदायाच्या संदर्भात ग्रामीण, निमशहरी पातळीवर व्यापक स्वरूपाची चळवळ उभी रहावी
- या समुदायाच्या सामाजिक स्वीकृतीचे मार्ग रुंदावले जावेत आणि सदर प्रक्रियेत शहरी समुदायांचा सहभाग असावा
- परिवर्तनवादी कार्यकर्ता म्हणून आपापल्या समूहाच्या चौकटीपलीकडे जाऊन, 'कार्यकर्ता ' म्हणून पुरोगामी चळवळींमध्ये आपली व्यापक ओळख निर्माण करण्यासाठी आपल्यामध्ये संवाद घडून यावा आणि आपले मैत्र जुळावे.

वरील उद्देशांच्या दिशेने मांडणी व चर्चेला खुला वाव मिळावा यादृष्टीने दिवसभरातील सत्रांचे विषय व वक्त्यांची निवड करण्यात आली होती. (परिशिष्ट २ - कार्यक्रमपत्रिका)

**स्वागत व सुरुवात**

कार्यक्रमाच्या उद्देशाला अनुरुप अशा दोन गीतांनी स्वागत व सुरुवात झाली. ‘बनाए सेतू समताधिष्ठीत समाज का…’ हे गीत **सीमा लिमये** यांनी म्हटले आणि त्यावर **जगदीश भोसले** आणि **सतीश सकिनाल** यांनी नृत्य सादर केले. दुसरे गीत “एक से दो भले, दो से भले चार, मंझील अपनी है दूर रस्ता करना पार” **अलका पावनगडकर** यांनी सादर केले.

या परिसंवादात सांगली, जळगाव, पुणे, मुंबई अशा विविध ठिकाणांहून ७०हून अधिकजण सहभागी झाले.







**प्रस्तावना**
परिसंवादाच्या आयोजक गटात सक्रीय असलेल्या स्त्रीवादी कार्यकर्त्या **मनिषा गुप्ते** यांनी परिसंवादाची पार्श्वभूमी व गरज मांडली. त्या म्हणाल्या, लैंगिकतेच्याबद्दल बोलणारे आणि बोलण्याची इच्छा/तयारी नसणारे असे ढोबळमानाने दोन गट सामाजिक आंदोलनामध्येही दिसतात. या दोघांच्यामध्ये सेतू बांधण्याचा हा प्रयास आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत चार ते पाच दशके सक्रीय असलेल्या मनिषाताईंनी लैंगिकतेच्या मुद्द्यावर विविध टप्प्यांवर काय भूमिका राहिली याचा ऐतिहासिक आढावा घेतला. सामाजिक आंदोलनांमध्ये अगदी सुरुवातीपासून लैंगिकतेच्या प्रश्नांबद्दल मौन बाळगले गेल्याचे दिसते. मात्र चळवळी जसजशा विकसित होत गेल्या तसतसा त्यांचा वैचारिक पट अधिक व्यापक होत गेला. हा प्रवास त्यांनी पुढीलप्रमाणे मांडला.

१९६०-७० च्या दरम्यान सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर झालेल्या जनआंदोलनांमध्ये स्त्री-पुरुष दोघेही सहभागी होते. या आंदोलनांचा अधिक भर व्यवस्थात्मक प्रश्नांवर आणि आर्थिक विषमतेवर होता. लैंगिकतेच्या प्रश्नावर वैचारिक स्वरूपाचे वाद जरूर झाले, पण ते प्रश्न आंदोलनाच्या प्राधान्याचे बनले नाहीत. सामाजिक विषमतेवर जशा कडाडून चर्चा होत असत तशा चर्चा स्त्री-पुरुष विषमता आणि सत्तासंबंध याविषयी होत नसत. त्यामुळे लैंगिकता वा कौटुंबिक हिंसाचार यासारखे मुद्दे परिघावर राहिले. पुरुष कार्यकर्त्यांचे आपल्या पत्नीबरोबर, जोडीदाराबरोबरचे वर्तन समतेचे नसेल आणि ते मुद्दे घेतले गेले तर चळवळीत फूट पडेल, आपल्यासमोरच्या इतर अग्रक्रमाच्या प्रश्नांवर लढण्याची शक्ती कमी होईल, अशी भावना होती.




१९७५ नंतर स्त्रीवादी चळवळ सुरु झाली. स्त्रियांच्या पुढाकाराने स्त्रीप्रश्नावर आंदोलने उभे झाली. तसेच जनआंदोलनातील स्त्रियाही स्त्रीवादी चळवळीत सहभागी होऊ लागल्या. तसे या नव्या विचारांचे वारे जनआंदोलनांपर्यंतही पोहोचले. स्त्रीवादी चळवळीने केवळ स्त्री प्रश्नांवर आवाज उठवला नाही, तर पुरुषसत्तेला प्रश्न विचारायला सुरुवात केली. जेंडरची (लिंगभाव) संकल्पना, लिंगभावआधारित सत्तासंबंध यांची स्पष्टता आली. त्यातून स्त्रीप्रश्नांची समज अधिक व्यापक होत गेली. प्रश्न मांडण्याची भाषाही बदलली. उदाहरणार्थ, पूर्वी 'विनयभंग', 'इव्ह टिझिंग' असे शब्दप्रयोग वापरून अन्यायाला सौम्य स्वरूप दिले जात होते, त्याऐवजी 'बलात्कार', 'लैंगिक अत्याचार' अशी थेट भाषा वापरात आली.

स्त्रीवादी चळवळ ही देखील एकजिनसी राहिली नाही. या चळवळीतून अनेक चळवळी उदयाला आल्या. उदाहरणार्थ आपापल्या प्रश्नांची नव्याने व्याख्या करत स्वत:चा अवकाश निर्माण करत दलित, आदिवासी, मुस्लिम स्त्रियांच्या चळवळी आकाराला आल्या.

१९९०च्या दशकात अस्मितेच्या मुद्द्यांवर ज्या चळवळी तयार झाल्या त्यातील LGBTIQ ही एक महत्त्वाची चळवळ आहे. एचआयव्ही/ एड्सच्या कार्यक्रमामुळे या विभिन्न लैंगिक ओळखींबाबत अधिक बोलले जाऊ लागले. अगदी भिन्नलिंगी लैंगिक व्यवहाराबद्दल खुलेपणाने बोलायचेही सामाजिक वातावरण नव्हते, पण एचआयव्हीच्या कामामुळे याबद्दल आणि विभिन्न लैंगिक ओळखींबद्दल बोलावे लागले. सेक्स वर्कर संघटित झाल्या आणि त्यांचे प्रश्न समोर आले.

व्यापक अर्थाने स्त्रीवादी चळवळ ही सेक्स वर्कर आणि LGBTIQ चळवळींच्या बाजूने उभी राहिलेली आहे. असे असले तरी आजही स्त्रीचळवळीअंतर्गत मतभिन्नताही आहेत. उदाहरणार्थ, काहींची समलैंगिकता वा विभिन्न लिंगओळखी मान्य करण्याची तयारी आहे पण त्याविषयी उघडपणे कशाला बोलायचे असे त्यांना वाटते. काहींची भूमिका सेक्स वर्कर या शोषितच आहेत, त्यामुळे 'आम्ही आमच्या इच्छेने धंदा करतो' असे म्हणणाऱ्या धंद्यातील स्त्रियांचा आवाज ऐकायची तयारी नाही. अशा वेगवेगळ्या भूमिका असल्या तरी LGBTIQ समूहांबाबत स्वीकारार्हता आहे. पुण्यात सर्वप्रथम रेनबो फ्लॅग बाकी झेंड्यांबरोबर फडकला हाही इतिहास आहे. विविध मुद्द्यांवर काम करणाऱ्या आंदोलनांनीही लैंगिकतेच्या मुद्द्यांवरील आपली समज रुंदावण्याची आवश्यकता आहे.

आजच्या टप्प्यावर LGBTIQ समुहांच्या चळवळींकडे पाहताना दोन अपेक्षा आहेत. या चळवळीला स्वत:च्या नजरेतून स्वत:च्या प्रश्नांकडे बघण्यासाठी स्वत:चा स्वतंत्र (exclusive) अवकाश हवा आहे, तसेच या समुहांनी केवळ लैंगिक ओळख व अस्मितेच्या चळवळीत न अडकता व्यापक परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेणेही आवश्यक आहे.

**सत्र १ - लैंगिकता, लिंग आणि लिंगभाव (sexuality, sex and gender)**

**वक्ते** - विद्या बाळ, हरिश सदानी, बिंदूमाधव खिरे, शमिभा




• <u>सामाजिक विरोध पत्करून स्वत:ची लैंगिक ओळख जाहीर करणाऱ्यांच्या पाठिशी उभारायला पाहिजे</u>

ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या आणि लेखक **विद्याताई बाळ** यांनी सेतू संवादाचा या प्रयोगाचे स्वागत केले. त्या म्हणाल्या सर्वांना माणसासारखे जगता यायला पाहिजे. माणूसपण म्हणजे विचार करणं आणि माणुसकी म्हणजे संवेदनशीलता, या दोन्हींसह प्रत्येकाला जगता आले पाहिजे यासाठी आपण हातात हात घालून आपला लढा व्यापक करायला हवा.

स्त्रियांच्या चळवळीचा मागोवा घेत त्या म्हणाल्या, स्त्री चळवळ जसजशी वाढत गेली तसतसा तिचा वैचारिक विकासही होत गेला. सुरुवातीच्या काळात हुंड्याविरोधी लढणारी, शारीरिक हिंसाचाराविरुद्ध लढणारी चळवळ हा चेहेरा होता. त्यानंतर न दिसणाऱ्या हिंसाचाराचेही मुद्देही उचलले. आरोग्य, शिक्षण यासारख्या जगण्यासाठीच्या मूलभूत सेवासुविधा न मिळणे, त्यापासून वंचित राहणे हेदेखील हिंसाचाराच्या कक्षेत आले. वेश्याव्यवसायातील स्त्रियांचे प्रश्नही स्त्रीचळवळीचा भाग मानले गेले. दलित स्त्रियांचे तिहेरी शोषण होते, त्यामुळे स्त्रीचळवळीत असण्याबबरोबरच त्यांच्या प्रश्नांना आणखीही आयाम आहेत हे समजत गेले. हाच प्रवास आज LGBTIQ समुहांपर्यंत येऊन पोहोचला आहे, ही नक्कीच स्वागतार्ह गोष्ट आहे.

सुरुवातीला मीदेखील LGBTIQ समुहांच्या प्रश्नांबद्दल अनभिज्ञ होते. पुण्यात लेस्बियन स्त्रियांच्या गटाचा एक कार्यक्रम झाला, त्यात मी मनोगते ऐकली, काही मुलींचे पालकही या कार्यक्रमात होते, या सर्व अनुभवातून माझी विचारप्रक्रिया सुरु झाली व समज वाढली. वेगळी लैंगिक ओळख घेऊन जगणे, आपली ओळख प्रकट करणे ही आजही खूप अवघड गोष्ट आहे. म्हणूनच पुढे येणाऱ्यांचे आपण स्वागत व अभिनंदन केले पाहिजे, असे सांगून विद्याताईंनी ओडिशामधील दत्ती चांद या ॲथलेटचा अनुभव सांगितला. तिने अलिकडेच आपण समलिंगी असल्याचे जाहीर केले. 'मला हवे तसे जगण्याचा मला अधिकार आहे,' या भूमिकेने तिने स्वत:ची ओळख जाहीर करण्याचे धाडस केले. याबद्दल तिचे अभिनंदन करून तिला पाठींबा द्यावा, असा प्रस्ताव विद्याताईंनी मांडला.

• <u>जेंडर निरपेक्ष पद्धतीने एकमेकांना समजून घेण्याची गरज आहे</u>

मावा (मेन अगेन्स्ट सेक्शुअल व्हायलन्स अँड ॲब्युझ) गटाचे संस्थापक आणि स्त्रीवादी भूमिकेतून पुरुषांसोबत काम करणाऱ्या **हरीश सदानी** यांनी समाजातील लिंगभावाचे राजकारण काय आहे आणि ते कसे बदलले पाहिजे यावर भाष्य केले. सामाजिक चळवळींनी स्वतंत्रपणे आपापल्या स्वतंत्र अवकाशात काम न करता इतरांशी जोडूण घेण्याची गरज त्यांनी मांडली.

आपल्या समाजात स्त्री व पुरुष या दोन लिंगांनाच मान्यता आहे आणि या दोन साच्यात बसेल अशा प्रकारचा लिंगभाव समाजाकडून घडवला जातो. प्रत्येक व्यक्तीला स्वत:चा लिंगभाव स्वत: ठरवता आला पाहिजे, या अपेक्षेपासून अजून आपण खूप दूर आहोत. जगात अर्जेंटिना हा एकमेव देश आहे जिथे Right to self-determination of one's own gender ला कायदेशीर मान्यता आहे. त्या दिशेने

जाण्यासाठी आपली जेंडर ओळख काय आहे हे तपासण्याचा अवकाश हवा, प्रत्येक जेंडरने दुसऱ्या जेंडरकडे निरपेक्षपणे / तटस्थपणे पाहिले पाहिजे आणि इतर ओळखींशी त्यांचा परपस्परसंबंध कसा आहे हे समजून घ्यायला हवे.

अशा प्रकारे जेंडर निरपेक्ष समज विकसित होण्यासाठी ‘मावा’ ने फिल्म फेस्टीव्हलच्या माध्यमातून अवकाश तयार केला आहे. ‘समभाव’ या शीर्षकाचा हा फेस्टीव्हल समावेशक स्वरूपाचा आहे. यामध्ये सर्व जेंडर ओळखींच्या फिल्मचा समावेश असतो. या फिल्म बघून त्यावर चर्चा होते. त्यातून आपल्या ओळखीबद्दल न लाजता, न भिता मांडता येणे, मनात साचलेल्या गोष्टी बोलायला जागा मिळते. इतरांबद्दलचे गैरसमज दूर होतात.

- <u>LGBTIQ समुदायांनी आपली ओळख जाहीर केली पाहिजे</u>

समपथिक ट्रस्टचे संस्थापक, समलैंगिकतेच्या मुद्द्यांवर सातत्याने लेखन व काम करणारे कार्यकर्ते **बिंदूमाधव खिरे** हेही परिसंवादाच्या आयोजक गटात सक्रीय आहेत. मुख्य प्रवाहातील चळवळीला आपल्याबद्दल जे प्रश्न आहेत ते दूर करण्याची जबाबदारीही LGBTIQ समुहांनी घ्यायला हवी, असे त्यांचे मत आहे.

ते म्हणाले, भारतात मनोचिकित्साशास्त्र (सायकिॲट्री) आणि कायदा या दोन्हींचे आव्हान LGBTIQ समुहांसमोर होते. समलिंगी असणे वा वेगळी लैंगिक ओळख असणे ही विकृती आहे आणि ती उपचाराने बरी होते, ही मानसोपचारतज्ज्ञांची भूमिका होती. ज्याविरुद्ध प्रदीर्घ लढा दिला गेला आणि त्यानंतर सोसायटीने लेखी स्वरूपात ही विकृती नसल्याचे मान्य केले. मेडिकल स्टिग्मा दूर झाला. तसेच समलिंगी संबंधांना बेकायदेशीर ठरवणारे भारतीय दंड संहितेचे कलम ३७७ सर्वोच्च न्यायालयाने २०१८ च्या निकालाने रद्दबातल केले, ज्यामुळे गुन्हेगारीकरणाचे आव्हान दूर झाले. अर्थात हे दोन्ही बदल अजूनही कागदोपत्री असून ते प्रत्यक्षात उतरवणे हे पुढचे मोठे आव्हान आहे.

त्याकरिता LGBTIQ समूहांनी काही बदल जाणीवपूर्वक केले पाहिजे. आपण आपली लैंगिकता लपवण्याची गरज नाही. जसे धर्म ही खाजगी बाब आहे, तसेच लैंगिक ओळख हीदेखील खाजगी बाब आहे. पण त्याआधारे आपण आपले अधिकार मागतो तेव्हा आपली आयडेंटिटी जाहीर करणे गरजेचेच आहे. उदाहरणार्थ, जर समलिंगी विवाहाचा अधिकार पाहिजे, ही मागणी असेल तर आयडेंटीटी छुपी ठेवून या अधिकाराचा लढा लढता येणार नाही.

- <u>पुरोगामी कार्यकर्त्यांनी लैंगिकतेच्या मुद्द्यांवर मोकळेपणाने बोलायला हवे</u>

परिसंवादाच्या आयोजक गटातील आणखी एक सक्रीय सदस्य **शमिभा** या जळगावच्या असून सामाजिक चळवळींमध्ये कार्यरत आहेत. तृतीयपंथी म्हणून आपले अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, केवळ ८ महिन्यांपूर्वी मी हिजडा म्हणून माझी ओळख जाहीर केली. पण आपण वेगळे आहोत याची जाणीव मला १४ व्या वर्षीच झाली होती. त्या वेगळेपणाचा मी अर्थ शोधला पण तो जाहीर सांगण्याची हिंमत मला आजवर मिळाली नव्हती.

सामाजिक चळवळीत १२ वर्षांहून अधिक काळ काम केलेल्या शमिभाला तिथेही लैंगिकतेबाबतच्या चर्चेचा अभाव जाणवला. या चळवळीत केवळ स्त्री व पुरुष या दोन लिंगांबद्दल चर्चा होते. यापलिकडे लैंगिक ओळखी आहेत याची जाणीवही नाही. पुरोगामी चळवळीकडून अधिक समजेची व संवादाची अपेक्षा आहे. त्यांनी समाजाच्या साच्यात अडकता कामा नये. आम्हाला केवळ सहानुभूती नको आहे, तर माणूस म्हणून ओळख हवी आहे. सिम्पथी नको एंपथी हवी आहे.

चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये जाणीव निर्माण करायला आपणच पुढाकार घेतला पाहिजे, असे मला आतून वाटते आणि त्यातून सेतू साधून संवादाची प्रक्रिया सुरु व्हावी. पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते समतेच्या वरच्या पायरीवर उभे आहात, त्यांनी हात देऊन आम्हाला वर येण्यास मदत करायला हवी, ही अपेक्षा आहे.

**सत्र २ - विविध सामाजिक चळवळी**

**वक्ते:** तेजस्वी सेवेकरी, सहेली, किरण व सुधीर, संग्राम, व्हॅम्प, मुस्कान आणि सीमा लिमये, प्राणी हक्क चळवळीतील कार्यकर्त्या




- <u>सामाजिक कार्यकर्त्यांच्या मनातील सेक्स वर्करविषयीच्या गैरसमजुती दूर व्हायला पाहिजेत</u>

परिसंवाद आयोजक गटातील सक्रीय सदस्य **तेजस्वी सेवेकरी** यांनी सहेली संस्थेचे आणि सेक्स वर्कर चळवळीचे म्हणणे मांडले. एचआयव्ही कार्यक्रमामुळे सेक्स वर्कर समुदायाकडे लक्ष गेले, या महिला संघटित होऊन कामाची सुरुवात झाली. पण धंद्याच्या पलिकडेही स्त्री म्हणून, नागरिक म्हणून या महिलांचे अनेकविध प्रश्न आहेत जे सुटायला हवेत हे या महिलांचे म्हणणे आहे.

सक्तीची सुटका करून पुनर्वसन लादणे हीदेखील मोठी समस्या आहे. असे प्रयत्न किती निष्फळ ठरतात हे यासंदर्भात झालेल्या एका अभ्यासातून दिसून आले आहे. महाराष्ट्रात तीन वर्षे सुटका केलेल्या केसेसचे ट्रॅकींग करून हा अभ्यास केला, ज्यामध्ये जवळपास ८०% पुन्हा व्यवसायात आल्याचे दिसून आले. पुनर्वसनासाठी म्हणून संस्थेत ठेवणे, तिथे कौशल्ये शिकवणे, या गोष्टी फसव्या असल्याचे यातून दिसून येते.

भारतात सेक्स वर्क करणे हा गुन्हा नाही, तरी धंदा करणाऱ्यांना पोलिसांकडून वेळोवेळी सतावले जाते. बॉम्बे पोलिस अॅक्ट १९५६ मधील सॉलिसिटींगचे कलम वापरून अनेकींना अडकवले जात आहे. हे गुन्हेगारीकरण त्वरित थांबवाबे यासाठी आमचा लढा चालू आहे.

सेक्स वर्करबद्दल सर्वसाधारण समाजात ज्या गैरसमजुती आहेत, तशाच त्या सामाजिक कार्यकर्त्यांमध्येही आहेत. वेश्याव्यवसायात असलेल्या सगळ्याजणी जबरदस्तीने, ट्रॅफीकींगमुळे येतात हा मुख्य गैरसमज आहे. काही महिला स्वत:च्या इच्छेने येतात आणि राहतात. ही गुंतागुंत समजून घेण्याची गरज आहे. मुख्य म्हणजे सेक्स वर्कर महिलांना काय वाटते हे समजून घेतले पाहिजे.

- <u>सेक्स वर्क आणि ट्रॅफीकींग यांची गल्लत होऊ नये</u>

हाच मुद्दा पुढे नेत सेक्स वर्कर संघटना (NNSW / VAMP) आणि संग्राम यांच्यासोबत काम करणाऱ्या **किरण** यांनी म्हटले की सेक्स वर्ककडे नैतिकतेच्या चौकटीतून पाहू नये. दोन प्रौढ व्यक्ती परस्परसंमतीने शारीरिक संबंध ठेवतात हे मान्य करण्याएवढी आपली वैचारिक समज व्यापक आहे. मग सेक्स वर्कमध्येही असेच घडते. केवळ त्यात पैशांचा व्यवहार आला म्हणून धंद्याला अनैतिक म्हणणे चुकीचे आहे. या कमाईवरच आमचे कुटुंब चालते.

ट्रॅफिकींग किंवा अवैध मानवी वाहतूक अनेक कारणांसाठी होते. केवळ धंद्यासाठी होते असे मानून त्यामुळे ट्रॅफीकींग व सेक्स वर्क यांची गल्लत करणे चुकीचे आहे. स्वेच्छेने धंदा करणाऱ्या महिला ट्रॅफीकींच्या विरोधात आहेत. त्यांच्या मदतीने वस्तीतील ट्रॅफींकींगला आळा घालता येतो. म्हणून त्यांच्यावर धाडी टाकून त्यांनाच लक्ष्य करण्याच्याऐवजी त्यांना अँटी-ट्रॅफीकींगच्या कामात सहभागी करून घ्यायला हवे अशी आमची मागणी आहे.

धंद्यातून जबरदस्तीने सोडवणे अयोग्य आहे. अशा प्रकारे 'सोडवलेल्या' महिलांना सुधारगृहात टाकले जाते. पुढे त्यांचे काय होते हे पाहिले जात नाही. त्यामुळे सक्तीची सुटका नको, तर सेक्स वर्क गुन्हेगारी मुक्त करा अशी आमची मागणी आहे. याखेरीज २०११ चे सेक्स वर्कर बील आमच्यावर थोपवलेले असून त्यातही सुधारणा होण्याची गरज आहे. आमच्या या मागण्यांसाठी आम्हाला सामाजिक बदलाचे काम करणाऱ्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे.

- <u>ट्रान्स व्यक्तींच्या आत्मसन्मानाच्या लढ्याला सामाजिक चळवळीची साथ पाहिजे</u>

वेगवेगळ्या लैंगिक ओळखी असलेल्यांना संघटित करण्याचे काम सांगलीची मुसकान संस्था करते. या संस्थेतले **सुधीर** यांनी सांगितले सन २००२ केवळ ७ जणांपासून आम्ही कामाची सुरुवात केली, आज जवळपास २००० जण संस्थेशी जोडले गेले आहेत. स्त्री-पुरुष या रूढ चौकटीबाहेरच्या आम्ही व्यक्ती असल्याने आम्हाला दडपले जाते. ट्रान्स व्यक्तींना समाजात मान्यता मिळावी यासाठी आम्ही एकेका व्यक्तीपर्यंत पोहोचून आमची चळवळ उभारली आहे.

संस्था म्हणून काम करतानाही आम्हाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. सुरुवातीला आम्हाला ऑफीस मिळाले नाही, ज्या ठिकाणी जागा मिळाली, तिथे लोकांनी दगड मारून हुसकावून लावले. अशा थेट विरोधाचा सामना करूनदेखील आम्ही आमच्या समुदायाला एकत्रित केले. प्रसारमाध्यमातून ट्रान्स समुदायाबद्दलच्या एकांगी बातम्या येतात. आमच्या समुदायातील काही व्यक्तींचे वागणेही चुकते, पण तेवढेच दाखवले जाते. तसे वागण्यास ती व्यक्ती का उद्युक्त झाली हे दाखवले जात नाही. असे न करता आम्ही करत असलेले चांगले काम लोकांसमोर आणण्याचे काम मिडियाने केले पाहिजे. तरच माणूस म्हणून आत्मसन्मानाने जगण्याच्या आमच्या प्रयत्नांना सामाजिक पाठबळ मिळेल. आम्हाला व्यापक चळवळीचे सहकार्य आणि पाठबळ हवे आहे. संवादाचे असे प्रयत्न स्वागतार्ह आहेत, पण यामध्ये सातत्य राहायला हवे.

- <u>माणसांप्रमाणेच प्राण्यांची हक्कांची जाणीव ठेवावी</u>

प्राणी हक्कांसाठी काम करणाऱ्या **सीमा लिमये** यांनी म्हटले मुक्या जनावरांची मानसिकता माणसाने समजून घ्यायला हवी. रस्त्यांवर बेवारस फिरणाऱ्या प्राण्यांना वैयक्तिक पातळीवर मदत करण्याचे काम अनेकजण करत आहेत ही चांगली गोष्ट आहे. मात्र या प्राण्यांसाठी असलेल्या सरकारी योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नाही, ही खंत त्यांनी मांडली. येणाऱ्या निधीचा गैरवापर होतो, पकडून नेलेल्या प्राण्यांना अत्यंत घाण अवस्थेत ठेवले जाते, या गोष्टी थांबल्या पाहिजेत. प्राण्यांना क्रूर वागणूक देण्याविरुद्ध कायदा आहे, त्याचे काटेकोर पालन झाले पाहिजे. माणसांमध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी प्राण्यांप्रतीही संवेदनशील असले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.



**सत्र ३ - Identities / अस्मिता**

**वक्ते:** अच्युत बोरगावकर, तथापि, हसीना खान, बेबाक कलेक्टीव्ह, गौरी भोपटकर, भटके विमुक्त समाज



- <u>अस्मितेचे भान हवे, पण लढे केवळ अस्मिता-केंद्री नसावेत</u>

तथापि संस्थेच्या **अच्युत बोरगावकर** यांनी आपल्या कामाचे अनुभव मांडले आणि विविध लैंगिक ओळखी व अस्मितांभोवती उभ्या राहणाऱ्या चळवळीसमोर कोणकोणती आव्हाने आहेत हेही मांडले.

सेतू संवादाचा उभारताना आपल्या या कामाचा राजकीय विचार काय आहे हे स्पष्ट असणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी म्हटले. आपला मुद्दा अधिक स्पष्ट करताना अच्युतने पुरुषांसोबतच्या कामाचा आपला अनुभव सांगितला. स्त्री हक्काच्या चळवळीत पुरुषांनी यावे यासाठी आम्ही काम केले. यातून पुरुषांचा घरकामात सहभाग वाढला, शिव्या देणे कमी झाले, मुलांच्या संगोपनातात सहभाग वाढला. हे सकारात्मक बदल घडले. याबरोबरीनेच पुरुषसत्तेविषयीची समजही बदलली पाहिजे होती, पण तसे झाले नाही. या कामात काही पेचाचे मुद्देही अनुभवाला आले. उदाहरणार्थ, पुरुषांच्या अस्मिता जात, धर्म, लिंग, वर्गाशी घट्टपणे निगडित आहेत आणि त्या बदलणे जरूरीचे असले तरी त्या पातळीपर्यंत आपण पोहोचू शकलो नाही असे आम्हाला जाणवले. प्रतिगामी, धर्मांध शक्तींबद्दलची त्यांची जवळीक, 'मर्द' पणाशी निगडित आक्रमक, हिंसक आणि स्त्रीला व समोरच्या माणसाला कमी लेखणाऱ्या संकल्पना दूर करणे, बदलणे आवश्यक आहे, पण तसे झाले नाही.

काहींनी आम्हाला सांगितले की आता आम्ही घरीही भांडत नाही आणि कामाच्या ठिकाणीही भांडत नाही. तेव्हा वाटले कामाच्या ठिकाणी पुरुषांनी किंवा कोणीही त्यांच्या अधिकारांची पायमल्ली होत असेल तर भांडलेच पाहिजे. पुरुषांच्या मनातील अन्यायाची चीड घालवणे (पेसिफाय करणे) हा आमचा हेतू नव्हता. एकंदरीतच व्यवस्थेला प्रश्न विचारायचे नाहीत, ही आपली सामाजिक धारणा आहे, ती आपल्याला सामाजिक बदलाच्या कामातून साधली पाहिजे ही अपेक्षा असते, पण ती साधली जात नसल्याचे आम्हाला जाणवले.

कोणत्याही समूहाला स्वत:ची जागा तयार करण्यासाठी अस्मितेचे भान असावे लागते. पण आपले लढे जर केवळ याच अस्मितांभोवती फिरत राहिले तर ते कुंठित होतात. अस्मितांची प्रतीके तयार होतात आणि त्यातून चांगली उदाहरणे निर्माण झाली तरी व्यवस्थेत परिवर्तन होत नाही. उदाहरणार्थ, पहिली महिला अध्यक्ष, पहिली तृतीयपंथी प्राध्यापक, पहिला कृष्णवर्णीय अध्यक्ष इत्यादी गोष्टी,

म्हणजे आजवर जे अधिकार ज्या समूहाला मिळाले नाहीत ते मिळायला लागणे हे बदलाची चाहूल म्हणून पाहिले जाते. पण अशा प्रतिकात्मक बदलातून व्यवस्थात्मक बदल साधले जातातच असे नाही. त्यामुळे आपले लढे केवळ अस्मिता-केंद्री असता कामा नयेत.

- देशाचे नागरिक म्हणून भटके विमुक्तांची ओळख स्थापित झालेली नाही

इकोनेट या संस्थेमार्फत भटके विमुक्त समाजासोबत काम करणाऱ्या **गौरी भोपटकर** यांनी म्हटले की भटकेविमुक्त समाजाचे खूप प्रश्न असले तरी त्यांचा लढा अजून खूप प्राथमिक स्तरावर आहे. स्त्रिया, दलित यासारखे समाजात दुय्यम स्थान असलेले विविध घटक आहेत. पण त्यांनी आपल्या लढाया लढून स्वत:ची ओळख निर्माण केली, हक्क प्रस्थापित केले आहेत. अशा लढ्यापासून भटकेविमुक्त समाज अजून खूप दूर आहे. त्यांच्यामध्ये जागृती होण्याची आणि इतर समाजानेही त्यांचे माणूसपण स्वीकारण्याची नितांत गरज आहे.

भटकेविमुक्त समाज एकजिनसी नाही, विविध जातींचा समुदाय आहे. प्रत्येक जाती स्वत:ची अस्मिता आहे. त्यांच्यात परस्परसंवादाचा अभाव आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान नसल्याने प्रत्येकजण आपापल्या समाजाला धरून राहतो. त्यांची जात हीच त्यांची ओळख आहे व त्यामुळे तो जातीच्या रूढ रितीरिवाजांमध्ये अधिक गुरफटतो. म्हणूनच या समाजात जात पंचायतीचे प्राबल्य आहे आणि स्त्रियांभोवतीची चौकट अधिक घट्ट आहे. या सर्वाविषयी त्यांच्याशी संवाद करण्याची, जाणीवजागृतीची गरज आहे. तसा वावही आहे, कारण अन्य प्रस्थापित समाजापेक्षा हा समाज अधिक खुला आहे. स्त्री-पुरुषांमध्ये मोकळेपणा आहे. त्यांनी स्वत:ला माणूस म्हणून, नागरिक म्हणून बघायला पाहिजे आणि जातीनिहाय अस्मितेपलिकडे गेले पाहिजे. म्हणूनच त्यांच्याशी संवाद करण्यासाठी विविध चळवळींनी पुढाकार घ्यायला हवा.

- फाशीवादी सरकारविरोधात राजकीय लढाई करण्याची गरज

ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या आणि बेबाक कलेक्टीव्ह संस्थापक **हसीना** यांनी म्हटले की मुसलमान समाजाच्या नागरिकत्वापासून ते सुरक्षेपर्यंत अनेक समस्या आहेत. देशातील दुसऱ्या क्रमाकांची लोकसंख्या असूनही मुस्लिम समाजाला त्यांचे नागरिकत्वाचे अधिकार मिळत नाहीत. राज्यकर्त्यांनी हेतूत: पसरवेल्या मुस्लिमद्वेषामुळे हा समाज असुरक्षित आहे. त्यामुळे मुस्लिम स्त्रियांशी बोलताना समुदायाची पितृसत्ता आणि व्यापक समाजाकडून अल्पसंख्य वागणूक, फॅसिस्ट वृत्ती या दोन्हीचाही परिणाम मुस्लिम महिलांच्या जीवनावर होतो याचे भान आम्हाला ठेवावे लागते. आजच्या परिस्थितीत मुस्लिम महिलांची आमची चळवळ बॅकफूटवर आलेली असताना लैंगिकता आणि स्वत:च्या शरीरावर स्वत:चा हक्क यासारख्या संकल्पना त्यांच्याशी बोलणे खूप अवघड जाते.

सरकारच्या तिहेरी तलाक विरोधी कायद्याला आमचा विरोध आहे कारण स्त्रियांच्या हक्कांच्या विचाराने हा कायदा केलेला नाही. कायद्याच्या दृष्टीने मुस्लिम महिला या तलाकपीडित आहेत, तर समुदायाच्या दृष्टीने मुस्लिम महिला या त्यांच्या सन्मानाचे प्रतीक आहेत. तिहेरी तलाकचे गुन्हेगारीकरण होता कामा नये. त्यामुळे मुस्लिम पुरुषांना थेट लक्ष्य केले जाईल ही भीती महिलांमध्ये आहे. वंचित बहुजन आघाडीसारखे पर्यायी राजकारण करणारे राजकीय प्रयोगही ओवेसींसारख्या मुस्लिम महिलांप्रती अत्यंत प्रतिगामी भूमिका असणाऱ्यांशी आघाडी करतात त्यामुळे आमचा राजकीय अवकाश आणखीनच संकुचित झाल्याचे जाणवते. आज फाशीवादी सरकारविरोधात राजकीय लढाई करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्व सामाजिक चळवळींनी एकत्र येण्याची गरज आहे.

**सत्र ४ - कला**

**वक्ते:** अनुभव बर्वे, मैत्रेयी, धर्मकिर्ती सुमंत, वैभव अबनावे




या सत्राची सुरुवात करताना परिसंवाद आयोजक गटातील सक्रीय सदस्य आणि अभ्यासक व कलाकार **जमीर** यांनी सामाजिक चळवळीशी, कार्यकर्त्यांशी निकटचा संबंध आहे अशा कलाकारांचा समावेश या सत्रात असल्याचे सांगितले. संवाद साधायचा तर विविध चौकटीतल्या लोकांनी एकत्र यायला पाहिजे. कलाकार ही जशी चौकट आहे, तशीच सामाजिक कार्यकर्ते ही देखील चौकटच आहे. कलाकार स्वत:च्या कलाविश्वात मग्न असतात, त्यांना वास्तवाचे व वास्तव जीवनातील समस्यांचे भान नसते कारण त्यांची आंतरिक ऊर्मी त्यापलिकडे पाहण्याची असते, असे मानले जाते. तर सामाजिक कार्यकर्ते फक्त आणि फक्त वास्तवाचा विचार करतात, त्यामुळे त्यापलिकडे पाहण्याची क्षमता वा इच्छा ते गमावून बसतात, असे समजले जाते. सामाजिक चळवळी आणि कलाभान यांचा परस्परसंबंध कसा आहे व कसा असला पाहिजे हे कलाकारांच्या नजरेतून व प्रयोगातून पुढे येईल ही अपेक्षा आहे.

पुण्यात एचआयव्ही/एड्सवर संशोधनात्मक काम करणाऱ्या ‘प्रयास’ या संस्थेने अलिकडेच ‘सेफ जर्नीज्’ ही फिल्म मालिका तयार केली आहे. युवा पिढीला भेडसावणाऱ्या लैंगिकतेच्या प्रश्नांची चर्चा यामध्ये अत्यंत सहज, सोप्या पद्धतीने केली आहे. या सत्रातील चौघेही वक्ते या फिल्मच्या निर्मितीशी जोडलेले होते.

- <u>लैंगिकता ही जीवनाचा अविभाज्य भाग आहे, मग औपचारिक शिक्षणात त्याचा समावेश का नाही</u>

ज्या संशोधन प्रकल्पावर ही फिल्म मालिका आधारित आहे त्याविषयी बोलताना प्रयासच्या **मैत्रेयीने** सांगितले की ‘youth in transition’ या संशोधनात आम्ही २०-२९ वयोगटातील १२४० युवक-युवतींच्या मुलाखती घेतल्या. युवा वर्गाला त्यांच्या आयुष्यातील अनेक गोष्टींबद्दल कुठे बोलायचे हे समजत नाही, कारण त्यासाठी जागा नाही हे आमच्या लक्षात आले. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणात ‘लैंगिक शिक्षण’ समाविष्ट नाही. लैंगिक शिक्षण खरे तर आयुष्याशी, जगण्याशीच संबंधित आहे, पण औपचारिक शिक्षण व्यवस्थेत त्याला स्थान नाही. त्यामुळे लैंगिकतेविषयी मनात करेच गोंधळ व गैरसमज तयार होतात. या निष्कर्षांच्या आधारे योग्य संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही फिल्म माध्यम वापरायचे ठरवले.

- <u>आर्टवाले आणि एनजीओवाले ही दरी कमी केली</u>

या फिल्म तयार करताना आर्टवाले आणि एनजीओवाले ही दरी कशी कमी केली याविषयी **अनुपम बर्वे** म्हणाले की फिल्म हा फॉर्म आणि त्यातून मांडायचा विषय यादोन्हीतील जाणकारांनी एकत्रित काम केल्याने ही मालिका प्रभावी बनली आहे. बऱ्याचदा कलाकार व कार्यकर्ते स्वतंत्र बेटावर असल्यासारखे अस्तित्वात असतात आणि स्वतंत्रपणे काम करत राहतात. मात्र प्रयासच्या फिल्मसाठी आम्ही

एकत्रित काम केले. म्हणूनच फिल्म सोप्या असाव्यात, मेनस्ट्रीमपर्यंत पोहोचणाऱ्या असायला पाहिजेत, विषयाची मांडणीही सखोल हवी आणि कलात्मकताही जपली गेली पाहिजे, या सर्व घटकांचा, अपेक्षांचा ताळमेळ घालता आला.

- <u>अशक्याला शक्यतेच्या आवाक्यात आणणे हा आपल्या सर्वांचाच प्रयत्न</u>

नाटककार आणि लेखक **धर्मकिर्ती सुमंत** यांनी कलाकार आणि कार्यकर्ता यांची नाळ कशी जुळलेली आहे हे स्पष्ट केले. अशक्य वाटेल अशा गोष्टींची कल्पना करणे हा कलाकाराचा धर्म आहे, तर अशक्य वाटेल असे बदल प्रत्यक्षात आणणे हा कार्यकर्त्याचा धर्म. कलाकार कदाचित अशक्यत्वाचा वेध घेण्यात जन्म घालवेल, मात्र कार्यकर्त्याला ते अशक्य याच काळात शक्य व्हावे असे वाटत असते. या नजरेचा फरक सोडला तर दोघांतील समान धागा म्हणजे अशक्याला शक्य करणे हाच असतो.

- <u>समाजकारण/राजकारण हा देखील सर्जनशील व्यवहार आहे याचा विसर पडता कामा नये</u>

हेच सूत्र नाटककार आणि फिल्ममेकर **वैभव अबनावे** यांनी अधिक विस्ताराने मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक मक्तेदारीला आव्हान दिले. Thought is nobody's monopoly म्हणत त्यांनी प्रत्येकजण विचार करु शकतो, करतो हे मांडले. त्याचप्रमाणे सर्जनशीलता ही केवळ कलाक्षेत्राशी निगडित नसून प्रत्येक क्षेत्रात आहे. सर्जनशीलता म्हणजे जे दिसत नाही ते बघण्याचा प्रयत्न, अशक्य कोटीतले शक्यतेच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न. अशी सर्जनशीलता समाजकारण/राजकारणातदेखील आहे. मात्र त्याचे भान सामाजिक/राजकीय क्षेत्रांमध्ये ओसरले आहे. आपण कोणत्या अशक्य कोटीतल्या गोष्टी शक्यतेच्या कक्षेत आणू पाहात आहोत हा प्रश्न आज कलाकारांनी त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांनी स्वत:ला विचारायला पाहिजे.

संवादाचा सेतू बांधणे हा प्रयत्न स्तुत्य असला तरी आपल्याला पूल का बांधावे लागतात आणि पूल बांधल्याने काय साध्य होते याचाही विचार करायला हवा. जेव्हा आपण आपापल्या कप्प्यात अडकत जातो, तेव्हा पूल बांधावे लागतात. पण पूल हे केवळ साधनमात्र आहेत. त्यावरून आपल्याला कुठे जायचे आहे, कुठे भरारी घ्यायची आहे, हेही ठरवायला हवे. आणि हा दूरवरच्या क्षितिजाचा वेध घेण्यासाठी आपल्याला वास्तवाच्या पलिकडचे, दूरवरचे, अमूर्त बघावे लागते, जिथे सर्जनशीलता, कला कामी येते. केवळ पुलांचा विचार केला तर आपल्याला तत्कालिक वा मर्यादित उत्तरे मिळतील, पण जर पूलाचा वापर करून ज्याकडे झेपावायचे त्या क्षितिजाचा विचार केला तर आपल्याला अधिक अर्थपूर्ण उत्तरे मिळतील.



## सत्र ५ - आरोग्य

**वक्ते:** डॉ. गंगाखेडकर, डॉ. हेमा पिसाळ, डॉ. विनिता बाळ, साधना नातू




- <u>आपल्या ॲडव्होकसी कामाची धार कमी होता कामा नये</u>

ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ, 'नॅशनल एड्स रिसर्च इन्स्टीट्यूट (नारी)'चे माजी संचालक आणि ICMR च्या कम्युनिकेबल अँड इन्फेक्शिअस डिसिजेस'चे विद्यमान प्रमुख **डॉ. रमण गंगाखेडकर** यांनी म्हटले की एचआयव्हीमुळे समाजात आजवर दुर्लक्षित असलेल्या LGBTIQ समुदायांकडे सरकारचे, सामाजिक संस्थांचे लक्ष गेले. त्यामुळे हे समुदाय संघटित झाले, सन्मानाने उभे राहिले, सामाजिक स्टीग्मा कमी झाला, सरकारने धोरणात्मक गोष्टीतही त्यांना सहभागी केले. हे सर्व फायदे झाले आहेत. समुदायाच्या सहभागामुळे एचआयव्ही आटोक्यात आला. टीबी व अन्य सांसर्गिक आजारांबाबत जिथे समुदायआधारित काम झाले नाही, ते आरोग्य कार्यक्रम प्रभावी झालेले नाहीत. त्यामुळे सरकारलाही आता समुदायांच्या सहभागाचे महत्त्व समजते आहे. टीबी, हिपाटायटीस, मलेरिया इत्यादी सर्वच आजारांच्या प्रतिबंधांसाठी कम्युनिटी मोबिलायझेशन करावे अशी सूचना मी शासनापुढे मांडली असून पुढील काळात ते बदल होण्याची शक्यता आहे. ही आपल्या समुदाय संस्थांसाठी कामाची चांगली संधी आहे. आपले संघटित काम थांबता कामा नये, याची काळजी प्रत्येक समुदायाने घ्यायला हवी.




आपल्या ॲडव्होकसी कामाची धार कमी होता कामा नये ही काळजी देखील घेतली पाहिजे. सरकार हुषार असते आणि तुमच्यात विभागणी करून तुमची शक्ती कमी करते. खरे तर समुदायांचे बरेच प्रश्न सारखेच असतात आणि तुम्ही एकत्र असलात तर तुमचा आवाजही मोठा होतो. पण तसे होऊ नये म्हणून प्रशासकीय अडथळे निर्माण करण्याचे काम केले जाते. हे ओळखून आपण परस्परांसोबत राहून आपले काम चालू ठेवले पाहिजे.

• <u>हिंसाचार प्रतिबंध व आरोग्यविषयक गरजांचा विशेषत्वाने विचार व्हायला हवा</u>

आरोग्य हक्कासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्या **डॉ. हेमा पिसाळ** यांनी आरोग्य विषयक धोरणे, कायदे आणि उपलब्ध सेवा यांमध्ये LGBTIQ समुहांबद्दलची संवेदनशीलता दिसत नसल्याचे म्हटले. लैंगिक अल्पसंख्य समुदायांना स्त्रीचळवळीने सोबत घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'Our Bodies, Ourselves' या पुस्तकाने आरोग्य आणि लैंगिकतेचा विचार खूप समावेशकपणे मांडला. त्याची जागतिक पातळीवर खूप चर्चा झाली. महाराष्ट्राच्या पातळीवर IWHM, महाराष्ट्र आरोग्य हक्क परिषद, भारतीय स्त्रियांची आरोग्याची सनद यामध्ये LGBTIQ समुहाच्या मुद्द्यांचा विचार झालेला आहे. परंतु धोरणात्मक पातळीवर बरेच बदल होण्याची गरज आहे. LGBTIQ समुहातील व्यक्तींवर होणारा हिंसाचार, त्यांच्या विशिष्ट आरोग्यविषयक गरजा यांचा विचार व्हायला हवा आहे. विविध कायद्यांमधील स्त्रियांच्या हिंसाचाराची व्याख्या आणि तरतुदींची चिकित्सा होणे गरजेचे आहे. ट्रान्सजेंडर व्यक्तींना अनेक ताणतणावांना सामोरे जावे लागते, त्यामुळे त्यांच्यात मानसिक आजारांचे प्रमाण जास्त असून योग्य व संवेदनशील आरोग्य सेवांची गरज आहे.

• <u>मानसिक आरोग्य सेवा देणाऱ्यांचे पूर्वग्रह दूर झालेले नाहीत</u>

स्त्रीवादी मानसशास्त्रज्ञ **डॉ. साधना नातू** यांनी LGBTIQ समुहाच्या मानसिक आरोग्याच्या वास्तविक गरजा आणि प्रत्यक्षात उपलब्ध मानसोपचाराच्या सेवा यात मोठी दरी असल्याचे म्हटले. या व्यक्तींना त्यांचे वेगळेपण लहानपणापासून जाणवत असते. पण घरात, समाजात, शिक्षणसंस्थांत सगळीकडे केवळ भिन्नलिंगी स्त्री वा पुरुष असण्याला मान्यता असल्याने त्यांना बोलता येत नाही. घरच्यांच्या लक्षात येते व ते जेव्हा मानसोपचारतज्ज्ञाकडे नेतात. मात्र मानसोपचाराच्या कुठल्याही शिक्षणामध्ये LGBTIQ समुदायांचा समावेश नाही. आजाराचे निदान व उपचार याकरता ज्या मॅन्युअलचा वापर होतो (Diagnostic and Statistical Manual of Mental Disorders आणि International Classification of Disorders) त्यामध्ये जवळपास १९८० पर्यंत हे समुदाय ॲबनॉर्मल मानले गेले आहेत. त्यांना बदलण्यासाठी कन्व्हर्जन थेरपी, शॉक देऊन नॉर्मल बनवणे इत्यादी असा अघोरी उपचार पूर्वी केले जात असत आणि आजही काही प्रमाणात केले जातात. संवेदनशील सायकीॲट्रीस्ट व समुपदेशक हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत.

समलैंगिकता व विभिन्न लैंगिक ओळखींविषयी मानसोपचारात असलेला पूर्वग्रह 'मानसिक आरोग्यसेवा कायदा २०१७' ने खोडून काढला आहे. विभिन्न लैंगिकता असणे ॲबनॉर्मल किंवा मानसिक आजाराचे लक्षण नाही, आणि त्याआधारे या समुदायांशी भेदभाव केला जाऊ नये, असे या कायद्यात म्हटले आहे. या कायद्याने LGBTIQ समुहाचे हक्क मान्य केले व त्यांना संरक्षण दिलेले असले तरी ही भूमिका मानसिक आरोग्यसेवा देणाऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही.

• <u>शास्त्रीय संशोधनाची गरज</u>

संशोधक व स्त्रीवादी कार्यकर्त्या **डॉ. विनिता बाळ** यांनी शास्त्रीय ज्ञान उपलब्ध व्हायला पाहिजे यावर भर दिला. जेव्हा ज्ञान उपलब्ध नसते तेव्हा अज्ञानावर आधारित समजुती आणि अंधश्रद्धा या दोन्ही गोष्टींचा फैलाव होतो. त्यामुळे समलैंगिकता व विभिन्न लैंगिक ओळखी या नैसर्गिक आहेत हे दर्शवणारे आणि हार्मोन्स पातळीवरून काय व कसे आडाखे बांधता येतील याचे संशोधन व्हायला हवे आहे. सामाजिक उतरंड व विषमतेचा संशोधनाच्या विषयांवरही प्रभाव पडतो. उदाहरणार्थ, स्त्रियांसाठी जेवढी गर्भनिरोधके शोधली गेली तेवढे संशोधन पुरुष गर्भनिरोधकांबाबत झाले नाही. सत्ता पुरुषांच्या हाती असल्याने गर्भनिरोधनाची जबाबदारी स्त्रियांवरच लादली गेली. शास्त्रीय संशोधनातील हे बायस LGBTIQ बाबत पण दिसून येतात. हा समुदाय प्रभावशाली नसल्याने या विषयाला संशोधनासाठी प्राधान्य दिले जात नाही.

## सत्र ६ - राजकीय व आर्थिक सत्ताकारण

**वक्ते:** दिशा पिंकी शेख, दीपनिता, मुकुंद किर्दत




- <u>सत्तेच्या राजकारणाकडून फार अपेक्षा ठेवणे गैर ठरेल</u>

आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते आणि पुरुष उवाच गटाचे संस्थापक **मुकुंद किर्दत** यांनी त्यांच्या राजकीय कामातील निरीक्षणे विचारार्थ मांडली. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत 'आप'ने प्रयागराज येथून भवानीनाथ वाल्मिकी या किन्नर व्यक्तीला उमेदवारी दिली. त्या किन्नर आखाडा प्रमुख असल्या तरी तुम्ही कोणत्या समाजातून आला आहात यानुसार याही पंथात उतरंड आहे. कुंभमेळ्यात भवानीनाथ वाल्मिकी समाजातून आलेली असल्याने तिचे स्थान उच्च जातीतून आलेल्या किन्नर आखाडा प्रमुखापेक्षा कमी मानले जाते. अल्पसंख्य समुदायातही पुन्हा प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या नियमांनुसार अशी उतरंड तयार झालेली दिसते. पक्षाने जरी उमेदवारी दिली, तरी पक्ष कार्यकर्त्यांनी किन्नर उमेदवार स्वीकारला नाही आणि ते तिच्या प्रचारात सहभागी झाले नाहीत.

विविधता ही वेगवेगळ्या प्रकारची असू शकते आणि त्या विविधतेचा वापर करून राजकारणही करता येते. मात्र याची समज सत्तेचे राजकारण करणाऱ्यांमध्ये जितकी आहे तितकी सामाजिक, राजकीय चळवळी करणाऱ्यांमध्ये नाही. निवडणुकांची गणिते खूप वेगळी असतात व त्यात दुर्बल माणसांना स्थान मिळणेही अवघड दिसते. याची उत्तरे उपलब्ध सिस्टीममध्येही नाहीत. लोकशाहीकरणाची प्रक्रिया स्थापित करण्याचा विषय कुठल्याच पार्टीच्या अजेंड्यावर नाही आहे. याउलट मतदाराला कसे 'ग्राहक' बनवले जाते याचा अनुभव या निवडणुकीत आला. राष्ट्रप्रेमाची कल्पना मतदार ग्राहकाला विकली गेली आणि लोकही फसले.

- <u>लैंगिकतेवर संस्थांनी प्रथम स्वत:चा दृष्टीकोन अधिक व्यापक करण्याची गरज आहे</u>

सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्या **दीपानिता** या CSR शी संबंधित काम करतात. सीएसआरच्या दृष्टीने LGBTIQ समुदायांचा विषय नवा व वेगळा आहे. असे असले तरी संस्थांनी याबाबतचे प्रस्ताव त्यांना दिले पाहिजेत. त्यातून कोणत्या विषयांवर काम करायला हवे याविषयीचे त्यांचे प्रशिक्षणही होऊ शकेल.

संस्थांनी एक वेगळा विषय म्हणून लैंगिकतेवर काम करु नये. ते फारच मर्यादित स्वरूपाचे ठरते. लैंगिकता हा जर व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग असेल तर तो संस्थेच्या भूमिकेचा व कामाचाही अविभाज्य भाग असला पाहिजे. याबाबतचा आपला दृष्टीकोन अधिक स्पष्ट व व्यापक करण्याची गरज अधिक आहे.

- <u>विशेषपणाचा शिक्का नको, सामान्य नागरिक ही ओळख हवी आहे</u>

वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्त्या, कवियत्री, कार्यकर्ता अशी विविधांगी ओळख असलेल्या **दिशा पिंकी शेख** यांनी त्यांचे किन्नर म्हणून तसेच राजकारणातील अनुभव मांडले. त्या म्हणाल्या की मला सामान्य नागरिक म्हणून ओळख व मान्यता हवी आहे, माझी लढाई त्यासाठीची आहे. विशेषपणाचा दर्जा नको आहे. कारण मला एकटीला विशेष बनायचे नाही आहे, माझ्या समुदायाला या समाजात स्थान मिळायला हवे आहे.

सत्ता कुठलीही असो, घरातली, समाजातली किंवा राजकारणातली, ती तुमच्या जात, लिंग, वर्गावरच अवलंबून राहते. मी जन्माला मुलगा म्हणून आले, घरातला मोठा मुलगा, तेव्हा मला मोठेपणाची आणि पुरुष असण्याची ताकद आपसूक मिळते. जेव्हा मी स्त्री झाले तेव्हा माझी सत्ता गेली, माझा पुरुष जोडीदार माझ्यावर पॉवर गाजवू लागला. हिजडा असल्याने समाजात कोणते स्थान नव्हते, ताकद तर नव्हतीच, उलट पुरुषाला कमीपणा दाखवण्यासाठी बायल्या किंवा हिजडा म्हणून हिणवले जाते. समाजातली ही विषमता धोरणातही परावर्तित होते. तृतीयपंथी म्हणून मान्यता तर मिळते. पण लिंग काय याचा उल्लेख 'अन्य' श्रेणीखाली करावा लागतो. सर्वसाधारणपणे जे मुख्य नाही, महत्त्वाचे नाही, ते इतर वा अन्य म्हणून गणले जाते. आज विविध फॉर्म, ओळखपत्रे यावर माझी व माझ्यासारख्यांची ओळख 'अन्य' अशीच आहे.

राजकीय पक्षाच्या कामात सहभागी झाले पण तिथली परिस्थितीही बाकी समाजापेक्षा वेगळी नाही. आमच्या पक्षाच्या भूमिकेला विरोध वा टीका करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना आमच्या पक्षाचे पुरुष वाईट प्रकारे ट्रोल करतात. हे मला चुकीचे वाटते. मला पक्षाचे प्रवक्तेपद दिले जाते, मी जबाबदारी स्वीकारून कामही सुरु करते. पण पक्षाचे कार्यकर्ते माझ्या पदाचा अधिकार मानायला तयार नाहीत. मी मिटींग बोलावते, स्वत: वेळेत हजर राहते, पण संबंधित लोक येतच नाहीत. पक्षाची प्रवक्ता म्हणून मला टीव्ही चॅनेलवरुन चर्चेत सहभागी होण्याचे आमंत्रण मिळते, पण मी हिजडा आहे हे समजताच अचानक त्यांचा प्रोग्राम रद्द होतो. या सर्व अनुभवावरून आपले राजकारण हे अजूनही ठराविक चाकोरीतच फिरत असल्याचे दिसते. आपल्याला फार खोल जावे लागणार आहे, वरवरच्या बदलांवर समाधान मानून भागणार नाही.



## खुली चर्चा

सर्व सत्रे पूर्ण झाल्यावर खुली चर्चा झाली. त्यात काही वक्त्यांशी प्रश्नोत्तरे झाली आणि नंतर पुढील नियोजन झाले. यातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे

- **दोन ठराव करण्याचे ठरले**. विद्याताई बाळ यांनी त्यांच्या भाषणात सुचवल्याप्रमाणे ओडिशामधील दत्ती चांद या ॲथलेटने आपली लेस्बियन असल्याची ओळख जाहीर केल्याबद्दल तिला पाठींबादर्शक ठराव आणि टीव्हीए या चॅनेलने दिशा पिंकी शेख हिला दिलेले आमंत्रण माघारी घेतल्याने त्यांच्या भेदभाव व पूर्वग्रहाचा निषेधदर्शक ठराव करण्याचे ठरले.

**ठराव**

LGBTIQ आणि पुरोगामी सामाजिक चळवळी यांच्यातील अंतर दूर करण्याच्या हेतूने आयोजित "सेतू संवादाचा" या २५ मे २०१९ रोजी आयोजित परिसंवादात सहभागी आम्ही ६१ जण पुढील ठराव करीत आहोत:

"आपण समलिंगी असल्याचे जाहीर केल्याबद्दल दत्ती चांद या राष्ट्रीय ॲथलेटपटूचे आम्ही अभिनंदन करत आहोत. अशा प्रकारे पुढे येण्याचे धाडस दाखवणारी ती कदाचित पहिलीच राष्ट्रीय खेळाडू असेल. प्रत्येक व्यक्ती समान असेल (अनुच्छेद १४), तिला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल (अनुच्छेद १९) आणि लिंगाच्या (व लैंगिकतेच्या) आधारे होणाऱ्या भेदभावापासून ती मुक्त असेल (अनुच्छेद १५), अशी ग्वाही भारतीय राज्यघटनेने दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने भादंवि ३७७ सन २०१८ मध्ये रद्दबातल करून समलिंगी संबंध बेकायदेशीर नसल्याचे जाहीर केले आहे.

अशा प्रकारे व्यक्तीला तिची लैंगिक ओळख ठरवण्याचा अधिकार आहे अशी हमी या संविधानिक मूल्यांतून आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून दिलेली आहे. याबाबतीत दत्ती चांद हिला संपूर्ण निर्णयस्वातंत्र्य असून त्याच्या आड येणाऱ्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कृत्यांचा आम्ही निषेध करत आहोत."

**RESOLUTION PASSED IN SUPPORT OF OUR NATIONAL SPORTS ATHLETE DUTEE CHAND BY PARTICIPANTS AT THE SEMINAR ON '*SETU-SAMVADACHA*', IN PUNE ON 25TH MAY 2019**

The 61 participants from different districts of Maharashtra state who met for a daylong seminar on bridging the divide between the Sex/Gender/Sexuality/LGBTIQ movements and Other Social movements unanimously resolved that:

"We congratulate our national sports athlete Dutee Chand for going public with her same-sex relationship. She has shown tremendous courage in coming out and is perhaps the first national sports athlete to do so. The Constitution of India grants us the fundamental rights of equality (Article 14), expression (Article 19), a life of respect and dignity (Article 21) and freedom from discrimination on the basis of sex (and sexuality) (Article 15). In 2018, the landmark Supreme Court Judgment on IPC377 (Navtej Singh Johar v/s Union of India) decriminalized same sex consensual relations.

In the backdrop of our cherished constitutional values, the above Supreme Court judgment and to uphold every individual's human right to self-affirmation of gender identity and sexual orientation, we unequivocally support Dutee Chand's right to live her life on her own terms. We condemn every act of direct or indirect coercion, suppression or discrimination that she has had to face due to her sexuality and her being in a same sex relationship."

['*Setu-Samvadacha*' is an informal group of NGOs and individuals working towards bridging the divide the Sex/Gender/Sexuality/LGBTIQ movements and other social movements. This group organized a one day seminar in Pune on 25/05/2019 to discuss an intersectional understanding of gender and sexuality in the context of other movements for social change. This event was sponsored by Samapathik Trust (an LGBTIQ CBO from Pune) and Saheli Sangh (Pune)].

- २०१८ च्या Transgender bill संबंधात अधिक माहिती मिळावी,
  हिंदी/मराठीतून माहिती मिळाल्यावर अधिकाधिक समुदायापर्यंत ती पोहोचवता येईल, अशी चर्चा झाली. किरण आणि सुधीर (संग्राम) यांनी प्रादेशिक भाषांतून विधेयकाची माहिती उपलब्ध असून ती सर्वांशी शेअर करू असे सांगितले.
- त्याचा अधिकाधिक प्रसार व्हावा व नेमके मुद्दे समुदायापर्यंत पोहोचावेत याकरिता माहितीपर फिल्म क्लिप बनवाव्यात अशी सूचना आली.
- छोट्या ठिकाणी / तालुका पातळीवर पोहोचण्यासाठी अशी माहिती, फिल्म यांचा उपयोग करावा.
- आपल्याकडील उपलब्ध माहितीच्या (अहवाल, पत्रके, आकडेवारी, केस स्टडी इत्यादी) आधारे ऑनलाईन रिसोर्स तयार करावा. याकरिता विकिपिडियाचा वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण देण्याची तयारी संबंधित दोघांनी दर्शवली.
- 'सेतू संवादाचा' प्रक्रियेची पुढील दिशा काय असावी यावर दोन प्रकारचे मतप्रवाह होते. काहींचे म्हणणे होते पुढील नियोजन व कृती कार्यक्रम ठरवावा. त्यामुळे प्रक्रियेत सातत्य राहील. तर काहींच्या मते या गटाकडून लगेचच कृतीची अपेक्षा ठेवू नये, तर खुले विचारमंथन करण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी आणि परस्परांना आधार देण्यासाठी हा गट असावा.
- कार्यशाळा व परिसंवाद दरवेळी वेगवेगळ्या ठिकाणी घ्यावा. त्यामुळे गटाचे कामकाज केवळ पुणेकेंद्रित राहणार नाही.
- जिल्हानिहाय जाणीवजागृतीचे कार्यक्रम घेण्याची तयारी उत्तर महाराष्ट्रातील संस्थांनी दाखवली. त्यानुसार या संस्था व समपथिक यांच्या समन्वयाने धुळे, नंदूरबार, जळगाव याठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करता येईल.

दिवसभराचा परिसंवाद संपला आणि त्यातून एक नवा प्रवास सुरु झाला आहे, या आशावादी व आनंदी भावनेने समारोप झाला.

***

## परिशिष्ट १ - सेतू संवादक आणि परिसंवादात सहभागी कार्यकर्ते

**आपले सेतू संवादक - परिसंवादाचे आयोजक**

<u>पुण्यातील साथी:</u> बिंदुमाधव खिरे (समपथिक ट्रस्ट), तेजस्वी सेवेकरी (सहेली संघ), जमीर बदरुन्निसा, मनीषा गुप्ते (मासूम), अलका पावनगडकर, जगदीश भोसले, अनिल उकरंडे, अचुत बोरगावकर, हेमलता, सुहास कोल्हेकर, गीताली विनायक मंदाकिनी, साथीदार अभिलाष, नंदिनी जाधव (अंधश्रद्धा निर्मूलन समिती), मिलिंद देशमुख (अंधश्रद्धा निर्मूलन समिती), माधुरी आवटे (परिवर्तन), सारंग, अतुल चंदू
<u>पुण्याबाहेरचे साथी:</u> सुनीता गांधी, शमीभा, दिशा शेख, मीरा संघमित्रा, सुधीर (संग्राम, मुस्कान, सांगली)

**<u>२५ मे २०१९ च्या परिसंवादात जळगाव, सांगली, पुणे, मुंबई येथून आलेले ६१ कार्यकर्ते सहभागी झाले.</u>**



# Conference on gender and sexuality on May 25

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, MAY 24

A DAY-LONG conference on the intersectionalism of movements working on sex, sexuality, gender and LGBTIQ issues will be held at the Rashtra Seva Dal on May 25.

The conference 'Bridge of Dialogue' has been coordinated by the Samapathik Trust, which is working to create awareness and provide interventions for homosexuals and transgenders. Bindumadhav Khire, the founder of the trust, said, "Various social movements have been working on issues related to human rights for a long time. Many of these interact with others groups working on sex, sexuality and gender on a specific topic."

At least 50 participants will discuss various dimensions of this intersectionalism.

The Indian EXPRESS epaper editions Sat, 25 May 2019 epaper.indianexpress.com

